पुण्य नगरी

# शेतकऱ्याची स्वादुपिंडाच्या कर्करोगावर मात

## लॅपरोस्कोपिक व्हिपल शस्त्रक्रिया यशस्वी

**मुंबई :** वाशिम येथील ४५ वर्षीय शेतकऱ्याला स्वादुपिंडाच्या कर्करोगाचे निदान झाले आणि लीलावती हॉस्पिटलमध्ये मिनीमली इन्व्हेसिव्ह शस्त्रक्रियेने यशस्वीपणे उपचार करण्यात आले. त्यामुळे शिरोडकर यांना जीवदान मिळाले आहे.

वाशिम जिल्ह्यातील एका छोट्याशा गावातील शेतकरी रमेश शिरोडकर (रुग्णाच्या नावात बदल) यांना पोटदुखी, वजन कमी होणे, भूक न लागणे आणि गडद रंगाची लघवी अशा समस्या सतावत होत्या. स्थानिक डॉक्टरांकडे भेट देऊनही फरक पडला नाही. विविध तपासणी केल्यानंतर वाशिम येथील डॉक्टरांना , पित्त आणि स्वादुपिंडाच्या नलिकेच्या मुखाशी गाठ असल्यामुळे अवरोध कावीळ म्हणजेच पेरिअमपुलरी कर्करोगाचे निदान झाले. रुग्णाला पुढील उपचारासाठी लीलावती हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले.

कर्करोगामुळे शिरोडकर यांचे वजन लक्षणीयरीत्या कमी झाले होते. मूळ निदान होऊन एक महिना झाला होता. त्वरित उपचारात्मक शस्त्रक्रिया करण्यात अयशस्वी झाल्यास ट्यूमर मेटास्टॅसिस (इतर भागांमध्ये पसरतो) होऊ शकतो. तसेच रुग्णाला अनियंत्रित मधुमेह आणि पित्त नलिकेत स्टेंट होता; दोन्ही घटक अतिशय घातक आणि पित्तविषयक संसर्गास कारणीभूत ठरू शकतात. रुग्णाचे पीईटी सीटी स्कॅन, ट्यूमर मार्कर लेव्हल आणि कार्डिओरेस्पिरेटरी फिटनेस तपासणी करण्यात आल्याचे लीलावती रुग्णालयाचे जीआय सर्जन डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी सांगितले. लॅप्रोस्कोपिक व्हिपल शस्त्रक्रिया ही विलंब न करता नियोजनाप्रमाणे योग्य वेळी करण्यात आली. शस्त्रक्रिया आव्हानात्मक असून, पोटाच्या आणि स्वादुपिंडाच्या प्रभावी शस्त्रक्रियांपैकी एक मानली जाते. या दरम्यान स्वादुपिंड, पित्त नलिका आणि कर्करोगाची लागण झालेला भाग काढून टाकला जातो. यानंतर पुनर्रचना केली जाते, ज्यामध्ये लहान आतडे स्वादुपिंड, पित्त नलिका पोटाशी त्याच क्रमाने जोडले जातात. काहीवेळेस प्रमुख रक्तवाहिन्यादेखील काढून टाकल्या जातात आणि त्यांची पुनर्बांधणी केली जाते, अशी माहिती डॉ. कुलकर्णी यांनी दिली.

लॅप्रोस्कोपिक व्हिपल शस्त्रक्रियेचे फायदे म्हणजे ही लहान छिद्र पाडून केली जाते, यात वेदना कमी होतात, बरे होण्याचा कालावधी तसेच रुग्णालयातील कालावधी कमी होतो तसेच रक्तस्राव देखील कमी होतो . या शस्त्रक्रियेनंतर रुग्ण त्वरित बरा झाला आणि ८ व्या दिवशी त्याला घरी सोडण्यात येते. व्हीपल ऑपरेशनसाठी सामान्यत: ओटीपोटात छिद्र पाडावे लागते, ज्यामुळे शस्त्रक्रियेनंतर वेदना होतात आणि जखम होऊ शकते . २०३० पर्यंत स्वादुपिंडाचा कर्करोग हे कर्करोगाशी संबंधित मृत्यूचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे कारण ठरण्याची शक्यता आहे . त्याकरिता वेळीच निदान व उपचार करणे गरजेचे आहे .